477

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १७/१२/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.व्याजक ०५२३/प्र.क्र.११५/आस्था-१ दि.१६ डिसेंबर-२०२४

**विषय :-** पोलीसांना घरबांधणी अग्रिम योजनेंतर्गत बँकामार्फत घेतलेल्या कर्जाच्या व्याजातील फरकाची रक्कम अदा करणेबाबत.

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.न्यायाप्र-०५१८/प्र.क्र.३८७/(भाग-१)/विशा-६ क्र.व्याजक ०५२३ /प्र.क्र.११५/आस्था-१, दिनांक १६ डिसेंबर- २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१२१६१११३८३३५०२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

( प्रविण शिखरे )

पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).

कार्यासन अधिकारी का.क्र.३१, ३३

प्रत :-

अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह).

विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह).

प्रत:-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

पोलिसांना घरबांधणी अग्रिम योजनेंतर्गत बँकामार्फत घेतलेल्या कर्जाच्या व्याजातील फरकाची रक्कम अदा करणेबाबत.

## महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

**शासन निर्णय, क्रमांक: व्याजफ ०५२३/प्र.क्र.११५/आस्था-१**

नवीन प्रशासकीय भवन, १२ वा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**दिनांक :- १६ डिसेंबर, २०२४.**

वाचा:-

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग,क्र. अर्थसं-२०२४/प्र. क्र.३४/अर्थ-३, दि.१.४.२०२४.

२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०२४/प्र. क्र.८०/अर्थ-३, दि.२५.७.२०२४.

३) शासन निर्णय, समक्रमांक दि.५.९.२०२४

३) पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित यांचे पत्र क्र.पोगृम/वित्त व लेखा शाखा /गृहबांधणी अग्रिम २०२४-२५/ ३२९९/ २०२४, दि.०७.११.२०२४.

प्रस्तावना:-

वित्तीय वर्ष २०२४-२५ करीता मागणी क्र. बी-१, मुख्य लेखाशिर्ष २०५५A०८८, ५०, इतर खर्च " पोलिसांना घरासाठीच्या कर्जावरील व्याजातील फरकाची रक्कम अदा करणे" या प्रयोजनासाठी रु.९४,६५,५४,०००/- (अक्षरी रुपये चौ-यांण्णव कोटी पासष्ट लक्ष चोपन्न हजार फक्त) इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने वाचा येथील क्र.३ येथील शासन निर्णय दि. ५.९.२०२४ अन्वये अर्थसंकल्पीय तरतुदीच्या ६०% रक्कम म्हणजे रु.५६,७९,३२,४००/- एवढी रक्कम वितरीत करण्यात आली आहे. तथापि, कर्जाचा मासिक हप्ता वेळेत पूर्ण अदा न झाल्यास बँकेकडून २% प्रतिवर्षीप्रमाणे अतिरिक्त दंड व्याज आकारण्यात येते. तसेच बँकेचे हप्ते वेळेत न भरल्यास Insolvency and Bankruptcy Code, २०१६ अंतर्गत महामंडाळास दिवाळखोर घोषित केले जाऊ शकते ह्या सर्व बाबीचा महामंडळाच्या पतप्रतिष्ठेवर प्रतिकूल परिणाम होऊन महामंडळाचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते.सबब,सदरहू लेखाशिर्षाखाली केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी उर्वरित ४० % म्हणजेच एकत्रित एकूण १००% निधी वितरीत करण्याची विनंती महामंडळाने त्यांच्या दि.७.११.२०२४ च्या पत्रान्वये केली आहे. त्यानुषंगाने सदरहू लेखाशिर्षाखाली केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी उक्त उर्वरित ४०% निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय:-

राज्यातील पोलिस दलातील कर्मचाऱ्यांना घरबांधणी अग्रिम योजनेंतर्गत बँकांमार्फत घेतलेल्या कर्जाच्या व्याजाच्या फरकापोटी "मागणी क्र. बी-१, मुख्य लेखाशिर्ष २०५५ A०८८, ५०, इतर खर्च, "पोलिसांना घरासाठीच्या कर्जावरील व्याजातील फरकाची रक्कम अदा करणे" या लेखाशिर्षाखाली रु.९४,६५,५४,०००/- (अक्षरी रुपये चौ-यांण्णव कोटी पासष्ट लक्ष चोपन्न हजार फक्त) या अर्थसंकल्पीय निधीपैकी उर्वरित ४०% म्हणजेच रु.३७,८६,२१,६००/-(अक्षरी रक्कम रुपये सदतीस कोटी शह्याऐंशी लाख एकवीस हजार सहाशे फक्त) इतका निधी संगणकीय प्रणालीद्वारे (बीम्स) वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरचा खर्च "मागणी क्र. बी-१, मुख्य लेखाशिर्ष २०५५A०८८, ५०, इतर खर्च, पोलिसांना घरासाठीच्या कर्जावरील व्याजातील फरकाची रक्कम अदा करणे" या लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर निधी अधिदान व लेखा कार्यालय मुंबई येथून काढून संबंधितांना प्रदान करण्याच्या प्रयोजनासाठी पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकारी यांना आहरण संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. उपलब्ध करुन दिलेल्या वरील रकमेचा ताळमेळ, महालेखापाल यांच्या कार्यालयास नोंदविलेल्या खर्चाशी महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण १४ मधील नियम १५७ च्या परिशिष्ट-३ तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करून त्याबाबतची प्रमाणित माहिती शासनास विहित मुदतीत पाठविण्यात यावी. खर्चमेळाची माहिती महालेखापाल यांच्या कार्यालयाकडून प्रमाणित करून पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुखांची राहील.

५. सदर अनुदान वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३, दि.२५/०७/२०२४ रोजीच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून उपलब्ध निधीच्या मर्यादेत खर्च करणे बंधनकारक राहिल.

६. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.६१४/२०२४/व्यय-८, दि.२२.११.२०२४ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१२१६११३८३३५०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Digitally signed by BHAROSE M U
Date: 2024.12.16 11:41:03 +05'30'

**( मुं.उ. भरोसे )**
**कार्यासन अधिकारी, गृह विभाग**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव (अ. व सु.), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई.
६) पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलिस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित,वरळी, मुंबई.
७) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), १/२, नागपूर / मुंबई.
८) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परीक्षा ), १/२, नागपूर / मुंबई.
९) अवर सचिव, अर्थसंकल्प-३/व्यय-८, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) सह सचिव, पोल-७, गृह विभाग, मंत्रालय,मुंबई.
११) उप सचिव, अर्थ-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४) निवडनस्ती, आस्था-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

* * * * * * * * * * *